|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. १३ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत कार्यरत स्कूल ऑफ कॉमर्सच्या बी.कॉम. (BFSI) अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) अंतर्गत अप्रेंटिसशिपची महत्त्वपूर्ण संधी प्राप्त झाली आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रातील कामाचा अनुभव मिळणार असल्याने त्यांच्या करिअरसाठी ही संधी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

दि. ११ मे २०२६ रोजी विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि स्कूल ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने अप्रेंटिसशिप प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये बी.कॉम. (BFSI) अभ्यासक्रमातील एकूण १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना जळगाव जनता सहकारी बँक लिमिटेड तसेच जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड येथे अप्रेंटिसशिपची संधी मिळाली आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, स्कूल ऑफ कॉमर्स आणि संबंधित बँकांदरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या (MoU) माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतानाच बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान मिळणार असून पहिल्याच वर्षी १४ विद्यार्थ्यांना ही संधी प्राप्त झाली आहे.

या निवड प्रक्रियेदरम्यान जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक येथून बँकेच्या मुख्य व्यवस्थापक शुभश्री दप्तरी, वरिष्ठ व्यवस्थापक मीनल नारखेडे, जळगाव जनता सहकारी बँक येथून डी जी एम अतुल नाईक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. या परिसर मुलाखतीचे आयोजासाठी स्कूल ऑफ कॉमर्सचे संचालक प्रा. रमेश सरदार, प्रा. राजेश जवळेकर, केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या सोनाली दायमा तसेच समन्वयक प्रा. उज्ज्वल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.

अप्रेंटिसशिपसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे तसेच कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत भौतिक शास्त्र प्रशाळेतील एम.एस्सी. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार ऑन जॉब ट्रेनिंग अंतर्गत अहमदाबाद  येथील नामांकित जे पी एम ग्रुप या इंडो-जपान कंपनीमध्ये औद्योगिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. प्रथमच विद्यार्थ्यांना अशा प्रकारची उच्च दर्जाची औद्योगिक संधी प्राप्त झाली असून यात एम.एस्सी. प्रथम वर्षातील १२ व द्वितीय वर्षातील २ असे एकूण १४ विद्यार्थ्यांची औद्योगिक प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.

या इंटर्नशिप प्रोग्रामचा कालावधी दोन महिन्यांची राहणार असून प्रशिक्षण काळात प्रत्येक विद्यार्थ्याला कंपनीकडून दरमहा सुमारे १५ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना आधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन प्रक्रिया तसेच उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासास चालना मिळून भविष्यातील करिअरसाठी ही संधी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

भौतिक शस्त्र विभागाच्या माजी विद्यार्थिनी स्वाती लोंढे या सध्या जे पी एम ग्रुप मध्ये एचआर मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या आणि भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. एस. घोष यांच्या पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षणासाठी संधी प्राप्त झाली आहे.

या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव श्री. व्ही. पी. पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा. जे. व्ही. साळी, विभागप्रमुख डॉ. एस. एस. घोष तसेच डॉ. डी. जे. शिराळे व डॉ. पी. जी. चव्हाण यांनीही निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता